# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

## सुचना

संदर्भ :- १) जाहीरात क्र. बीएमसी/जाहिरात/०१/२०१६ दिनांक २९ डिसेंबर २०१६.
२) जाहिरात क्रं पंदेकृवि/आस्था/जाहिरात/२०१६ (२) दिनांक १४ डिसेंबर २०१६.

डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला अंतर्गत संदर्भांकित १ वरील जाहिरातीनुसार कृषि विज्ञान केन्द्रातील **कुशल मदतनीस** या पदावर नियुक्ती करण्याकरीता ऑनलाईन अर्ज भरलेल्या व लेखी परिक्षेकरिता पात्र ठरलेल्या उमेदवारांची लेखी परिक्षा दिनांक १२ ऑगस्ट २०१८ रोजी खालील नमुद परिक्षा केंन्द्रावर आयोजित केलेली आहे.

तसेच डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला अंतर्गत संदर्भांकित २ वरील जाहिरातीनुसार **कनिष्ठ अभियंता (स्थापत्य)** या पदावर नियुक्ती करण्याकरीता ऑनलाईन अर्ज भरलेल्या व लेखी परिक्षेकरिता पात्र ठरलेल्या उमेदवारांची लेखी परिक्षा दिनांक १२ ऑगस्ट २०१८ रोजी खालील नमुद परिक्षा केंन्द्रावर आयोजित केलेली आहे.

उपरोक्त दोन्ही लेखी परीक्षेच्या प्रवेशपत्रासाठी विद्यापीठ संकेतस्थळावर www.pdkv.ac.in **दिनांक १९-०७-२०१८** पासून डाउनलोड करण्यासाठी लिंक उपलब्ध होईल. उमेदवारांना प्रवेशपत्राशिवाय (Hall Ticket) परिक्षेस बसण्याची परवानगी दिली जाणार नाही. सदर सर्व उमेदवारांची लेखी परिक्षा खालील नमुद केंद्रावर आयोजित केलेली आहे. तसेच या पदांसाठी लेखी परिक्षेकरिता पात्र ठरलेल्या सर्व उमेदवारांची यादी व लेखी परिक्षेचा अभ्यासक्रम विद्यापीठ संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

| अ.क्रं | पदाचे नांव | लेखी परिक्षा दिनांक व वेळ | परिक्षा केंन्द्राचे नांव |
|---|---|---|---|
| ०१ | **कुशल मदतनिस** | रविवार दि. १२-०८-२०१८<br>वेळ सकाळी १० ते ११ | श्री शिवाजी आर्टस, कॉमर्स, सायन्स महाविद्यालय, रामदास पेठ, अकोला. |
| | | | श्री शिवाजी हाय स्कुल, रामदास पेठ, अकोला. |
| | | | सिताबाई आर्टस कॉलेज, सिव्हिल लाईन्स, अकोला. |
| | | | एल.आर.टी.कॉमर्स कॉलेज, सिव्हील लाईन्स, अकोला. |
| | | | आरडीजी महिला महाविद्यालय, मुर्तिजापूर रोड,अकोला. |
| | | | कृषि महाविद्यालय, डॉ.पंदेकृवि, मुर्तिजापूर रोड, अकोला |
| ०२ | **कनिष्ठ अभियंता (स्थापत्य)** | रविवार दि. १२-०८-२०१८<br>वेळ दुपारी ०२ ते ०४ | आरडीजी महिला महाविद्यालय, मुर्तिजापूर रोड,अकोला.<br>कृषि महाविद्यालय, डॉ.पंदेकृवि, मुर्तिजापूर रोड, अकोला. |

संबंधित उमेदवारास विद्यापीठाने वरील पदासाठी पाठविण्यात आलेले **प्रवेशपत्र न मिळाल्यास** त्यांनी स्वत:चे नांव, जन्म तारीख व पत्ता असलेले फोटो ओळखपत्र सोबत आणुन संबंधित पदांच्या लेखी परिक्षेच्या एक दिवस अगोदर संगणक केंन्द्र,डॉ.पंदेकृवि, अकोला या विभागातून प्रवेशपत्र प्राप्त करून घ्यावे. म्हणजे त्यांना लेखी परिक्षेस बसण्यास अडचण जाणार नाही.

उपरोक्त पदांचे लेखी परिक्षेनंतर उमेदवारांची प्रमाणपत्र पडताळणी करण्यात येणार असून एखादा उमेदवार प्रमाणपत्र पडताळणी दरम्यान अपात्र आढळल्यास त्याचा लेखी परिक्षेतील गुणवत्ता ग्राहय धरण्यात येणार नाही. तसेच तो गुणवत्तेनुसार पात्र असला तरी अश्या उमेदवारांना निवड प्रक्रीयेसाठी अपात्र ठरविण्यात येईल. उमेदवारांचे प्रमाणपत्र पडताळणी बाबतचे वेळापत्रक नंतर विद्यापीठ संकेतस्थळावर जाहीर करण्यात येईल.

सदर पदावरील नियुक्ती,भरती प्रक्रीया व त्याकरता आयोजित लेखी परीक्षा अत्यंत पारदर्शक पध्दतीने राबविण्यात येत असल्यामुळे प्रक्रीये दरम्यान वा नंतर कोणी नोकरी लावून देण्याचे आमिष दाखविल्यास किंवा त्यासाठी पैशाची मागणी केल्यास संबंधित उमेदवारांनी अशा व्यक्तीचा/व्यक्तीची थेट नजीकच्या पोलीस स्टेशनला तसेच लाचलूचपत प्रतिबंधक विभागाकडे आवश्यक पुराव्यासह तक्रार दाखल करावी व त्याबाबतची माहिती कुलसचिव, डॉ.पंदेकृवि, अकोला यांना कळवावी.

कृपया संबंधितांनी वरील बाबींची नोंद घ्यावी.

दिनांक :-१६-०७-२०१८

स्वा/-
कुलसचिव,
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला.